माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०१५/२०१७-१८
दि.०८/०२/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.राजकिशोर मरुआ शाह, ................अपिलार्थी
४०७, तिरुपती बालाजी वंदना,
इंद्रलोक, फेस-४, न्यू गोल्डन नेस्ट,
भाईंदर (पूर्व), ता.जि.ठाणे ४०११०७.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.राजकिशोर मरुआ शाह यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.०३/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

मिरा भाईंदर महानगरपालिकेत आस्थापनेवर सदयस्थितीत कार्यरत असलेले श्री.हंसराज मेश्राम यांची नेमणूक महानगरपालिकेमध्ये सुरुवातीला कोणती नेमणूक करण्यात आलेली होती त्यांची मुळ नेमणूकी नंतर कोणत्या पदावर घेण्यात आलेले होते त्याप्रमाणे त्यांची शैक्षणिक पात्रता होती का? की त्यांची नेमणुक उद्यान अधिक्षक म्हणुन करण्यात आलेली होती. बिंदू नामावली नुसार त्या पदाकरिता शासनाची मान्यता घेण्यात आलेली होती का? त्याबाबतची श्री.हंसराज मेश्राम यांनी सादर केलेली शैक्षणिक सर्व कागदपत्रे, सर्विस बुक यांची सविस्तर लेखी माहिती व सर्व कागदपत्रे साक्षांकित करुन मिळाव्यात.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत कोणत्याही स्वरुपातील माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थी यांनी दि.०१/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०८/०२/२०१८ रोजी दुपारी ०१.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.आस्था/२१५/२०१८ दि.०३/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०३/०१/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना १० दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी अर्जदारास दिलेली आहे. सबब, सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.राजकिशोर मरुआ शाह,
४०७, तिरुपती बालाजी वंदना,
इंद्रलोक, फेस-४, न्यू गोल्डन नेस्ट,
भाईंदर (पूर्व), ता.जि.ठाणे ४०११०७.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.